*फक्त कार्यालयीन वापरासाठी*

निविदा सुचना क्रमांक ...............................

दिनांक .........................................................

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

सहयोगी अधिष्ठाता
कृषि महाविद्यालय, दापोली,
जि. रत्नागिरी.

**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**जि.—रत्नागिरी**

## वसतिगृह विभाग,कृषि महाविद्यालय, दापोली येथे ठेका तत्वावर मेस चालविणेबाबत

**कोऱ्या निविदा पत्रिका मिळण्याची मुदत**

**दिनांक २४/०५/२०१९ ते ३०/०५/२०१९**

**सकाळी ११.०० वाजेपर्यंत**

**निविदा पत्रिका स्विकारण्याची अंतिम तारीख**

**३०/०५/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत**

**निविदा पत्रिका उघडण्याची तारीख**

**३१/०५/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता**

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
## कृषि महाविद्यालय, दापोली

**जा.क्र. कृमविदा/वसति/ /२०१९** **दिनांक : २३.०५.२०१९**

## निविदा सूचना

कृषि महाविद्यालय, दापोली अंतर्गत सर्व विद्यार्थीकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) तयार करून पुरविण्याकरीता अन्न व औषध प्रशासनाच्या परवानाप्राप्त ठेकेदारांकडून (सुट्टीचे दिवस सोडून) कार्यालयीन वेळेमध्ये मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेचे सहशुल्क कोरे अर्ज, अटी शर्ती आणि सविस्तर माहिती वसतिगृह कार्यालयामध्ये दिनांक २४/५/२०१९ ते ३०/५/२०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रति निविदा शुल्क रु.२००/— रक्कमेस उपलब्ध होतील.

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | विद्यार्थ्यांची अंदाजे संख्या |
|---|---|---|
| १ | रत्नदुर्ग विद्यार्थी वसतिगृह (प्रथमवर्ष विद्यार्थी) | ७५ |
| २ | कनकदुर्ग विद्यार्थी वसतिगृह (द्वितीयवर्ष विद्यार्थी) | ६० |
| ३ | सिंधुदुर्ग विद्यार्थी वसतिगृह (तृतीय व चतुर्थ वर्ष विद्यार्थी) | १०२ |
| ४ | सुवर्णदुर्ग विद्यार्थी वसतिगृह (एम.एस्.सी. व पी.एचडी विद्यार्थी) | १०७ |
| ५ | जयप्रभा विद्यार्थीनी वसतिगृह (प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थवर्ष व जु.एम. एस्.सी. विद्यार्थीनी) | २९४ |
| ६ | जिजाऊ विद्यार्थीनी वसतिगृह (एम.एस्.सी. व पी.एचडी विद्यार्थीनी) | ३२ |

प्रत्येक वसतिगृहांसाठी स्वंतत्ररित्या सिलबंद निविदा पत्रिका दापोली येथील सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली यांचे कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदा उघडण्याची दिनांक ३१.०५.२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली यांचे कार्यालयात ठेकेदार किंवा ठेकेदारांचे प्रतिनिधी यांचेसमोर उघडणेत येतील. निविदा पत्रिकेच्या मागणीच्या वेळी पुरवठादाराने अन्न व औषध प्रशासनाचा परवाना (कॅटरींग लायसन्स) व इतर संबंधित कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. वरील बाबींची पुर्तता केल्याशिवाय मागणी पत्राचा विचार करणेत येणार नाही.

सविस्तर निविदा सूचना सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, वसतिगृह विभाग दापोली यांचे कार्यालयात कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत व विद्यापीठाच्या www.dbskkv.org या वेबसाईटवर या संबंधी माहिती पहावयास मिळेल.

सहयोगी अधिष्ठाता,
कृषि महाविद्यालय, दापोली
जि. रत्नागिरी

## सर्व साधारण अटी – (सर्व वसतिगृहाकरीता)

१. सदर निविदा भरणाऱ्या ठेकेदारांकडे अन्न व औषध प्रशासनाचा योग्य तो परवाना (कॅटरींग) असणे बंधनकारक आहे. असा परवाना नसणाऱ्या ठेकेदाराचा निविदा अर्ज रद्द करण्यात येईल.

२. बयाणा रक्कम धनाकर्षाद्वारे (डी.डी) स्विकारणेत येईल. धनाकर्ष हा 'डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली', यांचे नावे स्टेट बॅक ऑफ इंडीया, दापोली, सेन्ट्रल बॅक ऑफ इंडीया, दापोली किंवा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या शाखेवरील असावा. निविदे सोबत बयाणा रक्कमेचा धनाकर्ष दापोली येथील नसल्यास निविदा उघडण्यात येणार नाही.

३. बयाणा रक्कमेचा धनादेश, अन्न व औषध प्रशासन परवाना (कॅटरींग), अनुभव इ. निविदेसंबंधी कागदपत्र लखोटा नं. १ मध्ये बंद करावयाचा आहे. तसेच मुख्य निविदा फॉर्म लखोटा नं २ मध्ये सिलबंद करावयाचा आहे. असे दोन सिलबंद लखोटे एका स्वतंत्र लखोटयात सिलबंद करून सादर करण्यात यावेत.

४. सदर ठेका घेताना बयाणा रक्कम / सुरक्षा अनामत रक्कम भरणेबाबत सुट मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

५. निविदा अर्ज विक्री अथवा निविदा स्विकृती अथवा निविदा उघडण्याच्या तारखेला सुटी जाहीर झाली तर त्या दिवसाचे कामकाज लगतच्या कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

६. निविदे सोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे स्वसांक्षाकीत केलेली असावित. तसे त्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

७. अधिक माहितीसाठी वसतिगृहा विभाग, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली यांच्याशी कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

८. ज्या पुरवठादाराची निविदा स्विकारण्यात येईल त्या पुरवठादारास रू १००/– मात्रचे बॉण्डपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

९. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणास्तव नामंजूर करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१०. करारनामा व अनामत रक्कम जमा केल्याशिवाय मेसचा ताबा देण्यात येणार नाही.

११. ठेकेदारांनी स्थानिक स्वराज संस्थेचे या व्यवसायाचे आकारले जाणारे कर वेळेवेळी त्या त्या कार्यालयाकडे जमा करणे त्याचेवर बंधनकारक राहील. प्रत्येक ठेकेदाराने जिएसटी क्रमांक काढणे आवश्यक आहे. नसल्यास जिएसटी लागू नसलेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. निविदेमधे नमुद केलेले काम कमी/जास्त होण्याची शक्यता आहे किंवा संपुर्ण किंवा एखादे काम रदद्ही करणेत येईल. प्रत्यक्षात केलेल्या कामाचेच देयक अदा केले जाईल.

१३. आदेशीत केलेले काम पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारची अगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.

१४. भरलेल्या दराची मुदत एका शैक्षणिक वर्षासाठी अमलात राहील. तसेच अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही.

१५. निविदापत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमुद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरवणे इ. आक्षेपार्ह गोष्टी आढळुन आल्यास सदरची निविदा रदद् केली जाईल.

१६. एका पेक्षा जास्त पुरवठाधारकांनी सारखेच दर दिल्यास ठेका तत्वावरील मेसमध्ये जेवण पुरवठयाचे आदेश कोणास द्यावे/ विभागून द्यावे याबाबतचे हक्क विद्यापीठ प्रशासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१७. विद्यार्थ्यांच्या भोजन प्रबंधाकरीता प्रत्येक वसतिगृहात एका भोजनगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रत्येक भोजन व्यवस्थेच्या देखरेखीसाठी सांभाळण्यासाठी विद्यार्थ्यांची 'भोजन समिती' नेमली जाते. आवश्यकतेनुसार सदर समितीच्या सदस्य संख्येत वसतिगृह चिटणीस यांच्या परवानगीने बदल होवू शकतो.

१८. प्रत्येक महिन्यांकरीता वसतिगृहातील भोजनगृहामध्ये जेवण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांमधून किमान पाच नवीन सदस्यांची मेस कमिटीमध्ये सर्वानूमते निवडण्यात येईल व या समितीमार्फत भोजन विभागाची व्यवस्थेवर देखरेख ठेवली जाईल. सदरची संख्या कमी जास्त होवू शकते.

१९. भोजन विभागातील स्वच्छता, नीटनेटकेपणा, भांडयांचा वापर, इत्यादी बाबतीत ठेकेदार जबाबदार समजला जाईल.

२०. प्रत्येक विद्यार्थ्यांचे महिन्यातील फक्त चार खाडे वसतिगृह चिटणीस किंवा वसतिगृह प्रमुख यांच्या पूर्वपरवानगी घेतली असल्यास ग्राहय धरण्यात येतील. प्रत्येक विद्यार्थ्यास २६ दिवसांचे मेस बिल जमा करणे बंधनकारक असेल. तसेच इतर शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमात विद्यार्थी सहभागी असल्यास महाविद्यालय प्रशासनाच्या मा. विभाग प्रमुख व वसतिगृह प्रमुख यांच्या पूर्वपरवानगीने सूट देण्यात येईल. व ती ग्राहय धरणे ठेकेदारास बंधनकारक असेल.

२१. संबंधीत वसतिगृहामध्ये निवासी विद्यार्थ्यांव्यतिरिक्त बाहेरील कोणत्याही इसमास वसतिगृहातील भोजनगृहात जेवण देण्यास/घेण्यास सक्त मनाई राहील. तसे आढळून आल्यास संबांधीत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२२. प्रत्येक ठेकेदारास जेवणाच्या वेळा पाळणे बंधनकारक असेल. दुपारचे जेवण १२.०० ते २.०० आणि रात्रीचे जेवण ७.३० ते ०९.३० या वेळेत देणे आवश्यक आहे.

२३. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या वेळापत्रकाप्रमाणे मेस चालविणे बंधनकारक आहे.

२४. शासकीय, निमशासकीय शैक्षणिक संस्थांच्या वसतिगृहाची मेस चालविण्याचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२५. निविदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या मेस वेगवेगळया असून प्रत्येक मेसच्या ठिकाणी अन्न शिजवणे, स्वच्छता राखणे, अन्न टेबलावर वितरण करणे प्रत्येक ठेकेदारास बंधनकारक आहे.

२६. मेसमध्ये जेवण शिजवताना वापरण्यात येणारे तेल, मसाले, कडधान्ये, तांदुळ, आटा हा चांगल्या प्रतीचा असावा. (उदा. चांगल्या प्रतीचा डबल फिल्टर शेंगदाणा/सुर्यफूल तेल, बारीक, मध्यम बारीक स्वच्छ तांदूळ असावेत.)

२७. मेसमध्ये जेवण हे L.P.G. Gas वर शिजवणे बंधनकारक राहील. त्यासाठी लागणारा गॅस सिलेंडर ठेकेदाराने खरेदी करावयाचा आहे. अन्य कोणत्याही पद्धतीने जेवण शिजवता येणार नाही. सदर गॅस हा व्यवसायिक असणे बंधनकारक आहे.

२८. मेस ठेकेदाराने दिलेल्या मेनु प्रमाणे जेवण न दिल्यास त्या दिवसाचे मेस बील देण्यात येणार नाही.

२९. वसतिगृहातील मेस जशी आहे त्या पध्दतीनेच ठेकेदारास मेस चालवावी लागेल ठेकेदाराच्या म्हणण्यानुसार मेसमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही. मेसची प्रत्यक्ष पहाणी करून ठेकेदाराने दर द्यावेत.

३०. मुलींच्या वसतिगृहामध्ये जेवण शिजवण्यासाठी (गरज असल्यास मर्यादीत वेळेसाठी) एक पुरूष (आचारी) फक्त मेसमध्ये जाण्यास परवानगी दिली जाईल. उर्वरीत सर्व कामगार हे स्त्री मजूरच असणे बंधनकारक आहे.

३१. वसतिगृहातील कोणत्याही भोजनाच्या संबंधी तक्रारी उद्‌भवल्यास वसतिगृह प्रमुखांच्या नेतृत्वाखाली समितीची तात्काळ स्थापना करून त्याबाबत तपास करून समिती देईल तो निर्णय ठेकेदारास आणि विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

३२. मेसमध्ये साफसफाईसाठी लागणारे सर्व साहित्य हे ठेकेदारानेच आणावयाचे आहे. तसेच मेसमधील खरकटे हे नेमून दिलेल्या जागी नेवून ठेकेदाराने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.

३३. प्रत्येक वसतिगृहामध्ये चांगले, निर्जंतूक, स्वच्छ अन्न देण्याची जबाबदारी प्रत्येक ठेकेदाराची आहे. मेसमध्ये अस्वच्छता, अन्नभेसळ, विषबाधा यासारखा अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.

३४. संबंधित ठेकेदारास बाहेरील कोणत्याही प्रकारचे तयार अन्न पदार्थ भोजनालयात आणता येणार नाहीत.

३५. ठेकेदाराने आठवडयाचा दिलेला मेनू निश्चित करून सर्व विद्यार्थ्यांना गरम जेवण देण्याची व्यवस्था बंधनकारक आहे.

३६. मेसमध्ये काम करणारे सर्व मजूर हे गणवेशात असणे बंधनकारक आहे.

३७. जर एकापेक्षा अधिक मेस एका ठेकेदारास मिळाल्या तर त्या सर्व मेसचा मेनू हा ठरल्याप्रमाणे देणे बंधनकारक आहे. एका मेसमधून दुसऱ्या मेसमध्ये शिजवलेले तयार अन्न वहातूक करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास मेसचा ठेका तत्काळ रदद् करण्यात येईल आणि होणाऱ्या नुकसानास ठेकेदार जबाबदार राहील.

३८. ठेकेदारास मेसमध्ये वसतिगृह प्रशासनाकडून पुरविण्यात आलेल्या उपकरणांचा वापर करणे बंधनकारक आहे. तसेच इतर कोणत्याही प्रकारची विद्युत उपकरणे ठेकेदारास वापरता येणार नाहीत.

३९. ठेकेदाराने दर महिन्याच्या एक तारखेला मेसबिल त्या त्या वसतिगृहाच्या नोटीसबोर्डवर लावणे बंधनकारक आहे. दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत मेसबिल सर्व विद्यार्थ्यांच्याकडुन वसूल करणे व त्याची पोच पावती देणे बंधणकारक राहील. त्यानंतर प्रतिदिवस रू. १०/— प्रमाणे दंड आकारण्यात येईल. (सदर रक्कम दंडासहीत ठेकेदाराने वसूल करावी)

४०. संबंधित मेस ठेकेदाराने वेळोवेळी किमान महिन्यातून एकदा आपल्या मेसमध्ये पेस्ट कंट्रोल करणे बंधनकारक आहे. सदर काम केल्याचे प्रमाणपत्र मेसबिल जमा करण्याचे वेळेस वसतिगृह कार्यालयात जमा करण्यात यावे.

४१. ठेका दिल्यानंतर/स्विकारल्यानंतर काही कारणास्तव प्रथम क्रमांकाच्या ठेकेदाराची स्विकारलेली निविदा रद्द करावयाची झाल्यास दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास ठेका देण्यात येईल. व प्रथम दिलेल्या ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४२. यशस्वी ठेकेदारास या कार्यालयाकडे मेससाठी **रु.२०,०००/— व रु.३०,०००/—** अनामत ठेव ठेवावी लागेल.

४३. मेस ठेकेदार व कामगार यांची रहाण्याची व्यवस्था ही ठेकेदाराने करावयाची आहे. मेसमध्ये रहाण्यास सक्त मनाई आहे.

४४. मेसमध्ये मद्यपान व धुम्रपान करण्यास सक्त मानाई आहे. तसेच बाल कामगार ठेवण्यास सक्त मनाई आहे.

**सहयोगी अधिष्ठाता,**
कृषि महाविद्यालय, दापोली

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना —

मा. नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
अधिदान व लेखाधिकारी पूर्व लेखा परिक्षण पथक (१), डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
सहाय्यक नियंत्रक, कृषी महाविद्यालय, दापोली
सहाय्यक कुलसचिव, कृषी महाविद्यालय, दापोली
नोटीस बोर्ड कृषी महाविद्यालय, दापोली
नोटीस बोर्ड सर्व वसतिगृह, कृषी महाविद्यालय, दापोली
नगरपंचायत, दापोली

## ठेकेदारांनी मेसची निविदा सादर करताना विचारात घ्यावयाच्या खालील महत्वाच्या सूचना

१) नाव— निविदा भरणारे ठेकेदार हे स्वत: असल्यास संपूर्ण नांव पत्ता द्यावा व भागीदारी संस्था असल्यास तसे नमूद करून सर्व भागीदारांची नावे व पत्ता द्यावा आणि निविदेवर स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे नाव व पत्ता सुस्पष्ट लिहावा.

२) निविदेतील सर्व अटी मान्य असल्याबाबत निविदेच्या प्रत्येक पानावर/भागावर स्वाक्षरी करावी (उजव्या बाजूस).

३) मेस भागीदारीत चालावयाचे असल्यास पंजीकृत भागीदारी करारनाम्याची प्रमाणित प्रत निविदेसोबत सादर करावी व ती रजिस्टर ऑफ फॉर्म येथे नोंदविलेली असावी.

४) ठेकेदाराने स्वत:च्या मालकीचे (व्यावसायिक सिलेंडर) गॅस सिलेंडर वापरणे बंधनकारक आहे. यासाठी येणारा खर्च ठेकेदाराने स्वत: करावयाचा आहे.

५) मेसमध्ये सर्वजातीच्या, जमातीच्या व धर्माच्या लोकांकरीता कसलाही भेदभाव न ठेवता खाद्यपदार्थ तयार करायचे आहेत. .

६) यशस्वी ठेकेदारास १००/— रूपयाच्या मुद्रांकीत कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

७) मोहरबंद निविदा सादर करताना खालील दर्शविल्याप्रमाणे दोन लिफाफ्यामध्ये मोहोरबंद करून सादर करावी.

अ) लिफाफा क्रमांक १ — इसाऱ्याच्या रक्कमेचा धनादेश (डी.डी.) व आवश्यक ती अटी व शर्तीमध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे सादर करावीत.

ब) लिफाफा क्रमांक २ — मोहरबंद निविदा

उपरोक्त दोन्ही लिफाफे एका मोठया स्वतंत्र लिफाफ्यात घालून तो लिफाफा या कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या निविदापेटीत टाकण्यात यावा.

जर वरील बाब क्रमांक १ ते २ हे लिफाफा १ मध्ये न आढळल्यास क्रमांक २ लिफाफा उघडला जाणार नाही. लिफाफा क्रमांक २ मध्ये फक्त मोहरबंद निविदा सादर करावी.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

# वसतिगृह विभाग येथे ठेका तत्वावर मेस चालविणेबाबत

१) उपरोक्त करारनाम्यामधील सर्व अटी व सूचना मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हास मान्य आहेत.

२) वेतन व मजूर किमान वेतन नियमांचे अधिन राहून नियमांचे पालन करीन.

नांव ...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

सध्याचा संपूर्ण पत्ता — ...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

कायमचा पत्ता ...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

(खाद्य प्रबंधक)

रबरसिलसह

निविदाधारकाची सही व शिक्का

## डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
## जिल्हा – रत्नागिरी

दापोली येथील वसतिगृह विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली अंतर्गत वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरविणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **कामाचे नाव** | दापोली येथील वसतिगृह विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली अंतर्गत वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरविणे. | |
| 2. | **कामाचे पूर्ण वर्णन** | सूची प्रमाणे<br><br>विद्यार्थीनी आणि विद्यार्थ्यांकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक संबंधीत वसतिगृहाच्या भोजनालयामध्येच तयार करून पुरविणे. | |
| | | **प्रति वसतिगृहांसाठी** | **जयप्रभा वसतिगृहासाठी** |
| 3. | **कोऱ्या निविदापत्रिकेची किंमत** | **रु. 200/–** | **रु. 200/–** |
| 4. | **इसारा रक्कम** | **रु. 5,000/–** | **रु. 10,000/–** |
| 5. | **तारण अनामत** | **रु. 7,500/–** | **रु. 15,000/–** |
| 6. | **सुरक्षा अनामत रक्कम** | **रु. 20,000/–** | **रु. 30,000/–** |
| 7. | **कामाचा कालावधी** | **एका शैक्षणिक वर्षाकरीता सन 2019–20** | |

सहयोगी अधिष्ठाता,
कृषि महाविद्यालय, दापोली,
जि. रत्नागिरी

निविदाधारकाची सही व शिक्का

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

| टिपणी | ठेका तत्वावर भोजनालयामध्ये स्वयंपाक करून पुरविणे |
|---|---|
| 1. निविदा स्विकारण्यांत आली तर वेगळया कराराची आवश्यकता नाही आणि प्रत्यक्ष निविदा हेच कंत्राट म्हणून समजण्यांत येईल.<br>2. निविदेवरील स्वाक्षरीसाठी पहा, नियम 1 | मुद्रांक शुल्कातून सूट मिळावी पहा शा.नि.क्र. 368–क–1732, दिनांक 9 ऑक्टोबर 1989 |

## ठेका तत्वावर विद्यार्थ्यांना स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरविणाऱ्या परवाना धारकांच्या मार्गदर्शनासाठी सर्वसाधारण नियम व निर्देश

1. पेढीने निविदा सादर केलेली असल्यास, त्यातील प्रत्येक भागीदाराने ती स्वाक्षरीत केली पाहीजे किंवा कोणत्याही भागीदार अनुपस्थित असल्यास, तसे करण्यास प्राधिकृत करणारा मुखत्यारनामा धारण करणाऱ्या व्यक्तीने त्याच्या वतीने ती स्वाक्षरीत केली पाहिजे.
2. सदरचा ठेका एखाद्या पेढीने घेतला असेल तर सदर पेढीने त्यांच्यापैकी एकास या वसतिगृह प्रशासनाशी व्यवहार करण्याबाबत प्राधिकृत करावे व त्यास तसे मुखत्यारपत्र द्यावे. वसतिगृह प्रशासन त्याच व्यक्तीशी सर्व व्यवहार करेल व सदर व्यक्ती सर्व अटी व शर्ती पाळण्यास बंधनकारक राहील.
3. इसाऱ्याचे रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) 'डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली' यांचे नावे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा दापोली किंवा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली किंवा शहर शाखा दापोली किंवा सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा दापोली या बॅकावरील असावा व तो निविदेसोबत स्वतंत्र लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह जोडावा अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही. कॉल डिपॉझीट रिसीट स्विकारली जाणार नाही.
4. सहयोगी अधिष्ठाता किंवा त्यांचा रीतसर प्राधिकृत अधिकारी, ज्यांनी निविदा सादर केल्या असतील ते ठेकेदारांच्या किंवा त्या वेळी उपस्थित असलेल्या, प्रतिनिधींच्या समोर निविदा उघडतील आणि ती योग्य प्रपत्रानुसार तौलनिक विवरणात निरनिराळया निविदांच्या रक्कमांची नोंद करील. निविदांबरोबर पाठवलेल्या इसारा रक्कमेच्या पावत्या ती रक्कम मिळेल त्या दिवशी ठेकेदारांना देण्यात येतील. निविदा स्विकारली गेल्यास ओळख पटविण्याच्या प्रयोजनासाठी कंत्राटदार विनिर्देशांच्या प्रतीवर व आवश्यक असतील अशा अन्य दस्तऐवजावर स्वाक्षरी करील. निविदा नाकारली गेल्यास निविदा पाठवणाऱ्या ठेकेदाराला अनामत ठेवलेली इसारा रक्कम, पैसे परत केल्याची मागणी अर्ज केल्यानंतर परत करणेंत येईल.
5. निविदा निकालात काढण्यांस सक्षम असलेल्या अधिकाऱ्याला सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार असेल.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

## *वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरवठ्यासाठी निविदा*

मी / आम्ही, ———————————————————————————— खाली सही करणार, वसतिगृह नांव : —————————————————— वसतिगृहासाठी जोडलेले सूचित वर्णिलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरवठ्यासाठी सोबत जोडलेल्या शर्तीच्या अधिनतेसाठी निविदा पाठवित आहे / आहेत.

| | | | | **इतर वसतिगृहां साठी** | **जयप्रभा वसतिगृहा साठी** |
|---|---|---|---|---|---|
| क) | अनेक दुय्यम कामे अंतर्भुत असल्यास त्यांचा तपशील निराळ्या सूचीत दिला पाहिजे | क) | विद्यार्थी / विद्यार्थीनीकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक भोजनालयात तयार करून पुरविणे. | | |
| ख) | अनामत ठेवावयाची इसारा रक्कम | ख) | विद्यापीठ खात्यात रोखीने भरावयाची इसारा रक्कम रूपये: | रू. 5000 / – | रू. 10000 / – |
| ग) | तारण अनामत | ग) | तारण – अनामत | | |
| | | | 1. तारण अनामत रक्कम | रू. 7500 / – | रू. 15000 / – |
| | | | 2. सुरक्षा अनामत रूपये: | रू. 20000 / – | रू. 30000 / – |
| | | | एकूण रूपये | 32,500 / – | 55000 / – |
| घ) | तारण अनामत घेतली नसेल तेथे प्रकरणाच्या गरजेनुसार ही टक्केवारी 5 टक्के ते 10 टक्क्यापर्यंत वेगवेगळी राहील. तारण अनामत घेण्यात आली असेल तेथे ठेक्याच्या शर्तीचा खंड | घ) | वरील (घ) अन्वये आवश्यक केलेली तारण अनामत म्हणून आवश्यक ती एकूण रक्कम पूर्ण करण्यासाठी वजा करावयाची टक्केवारी वजा करावयाची ती ————— टक्के | | |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

च) काम सुरू करण्यासाठी लेखी आदेशाच्या दिनांकापासून दिलेला अवधी .......... दिवस/महिने किंवा दि. ...................... पर्यंत ही निविदा स्विकारण्यांत आल्यास, यासोबत जोडलेल्या विनिदेशाच्या अटी व उपदत्त आणि ठेक्याच्या शर्ती जेथवर लागू असतील तेथवर त्यांचे पालन व पूर्ती करण्याचे आणि त्यात कसूर झाल्यास उक्त शर्तीत उल्लेखिलेल्या पैशाच्या रकमा गमविण्यांचे व महाराष्ट्र शासनाला (त्यात यापुढे त्याचा शासन म्हणून निदेश केला आहे) देण्याचे मी/आम्ही कबूल करत आहे/आहोत. इसारा रक्कम दर्शविणाऱ्या * रू. ———————————————————————————————————— च्या रकमेबाबत स.नि.–1 येथील कोशागारातून दिनांक ————————— रोजी मिळालेली पावती क्रमांक—————————————— यासोबत पाठविण्यांत येत आहे. (ठेक्याच्या उक्त शर्तीच्या खंड 1 (1) नुसार मी/आम्ही तारण अनामतीची पूर्ण रक्कम भरली नाही तर ही रक्कम विद्यापीठ फंडात जमा केली जावू शकेल. नाहीतर पूर्वीच्या नुसार उक्त रक्कम विद्यापीठ तारण – अनामतीकारणे ठेवून घेईल. अथवा ........................................... (ख) ठेक्याच्या उक्त शर्तीच्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या तारण अनामतीकारणे विद्यापीठाला ही रक्कम ठेवून घेता येईल.)

* रक्कम अक्षरी व आकड्यात नमूद करावयाची

खंड तारण अनामत द्यावयाची नसल्यास

कोणतीही रोख तारण अनामत द्यावयाची असल्यास (ख) खोडावे

| | |
|---|---|
| साक्षीदाराची स्वाक्षरी | निविदाधारकाची स्वाक्षरी |
| नांव : | नांव : |
| पत्ता : | पत्ता : |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण व नाश्ता) पुरवठ्यासाठी शर्ती

| | |
|---|---|
| खंड 1 – एखाद्या ठेकेदाराची निविदा मंजूर झाल्यानंतर अटी व शर्तीनुसार सदर ठेकेदाराने काम करणे बंधनकारक आहे. सदर अटी व शर्तींचे पालन करण्यामध्ये ठेकेदाराकडून दिरंगाई झालेली आढळून आल्यास प्रत्येक वेळेस रू. 10,000/– मात्र एवढा दंड आकारण्यात येईल व सदर दंड दिलेल्या मुदतीत भरणे ठेकेदारास बंधनकारक राहील. | अटी व शर्तीप्रमाणे ठेका पूर्ण न केल्यास करावयाची कारवाई |
| खंड 2 – अटी व शर्तीनुसार संपूर्ण शैक्षणिक वर्षामध्ये जेवण पुरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. यामध्ये काही कारणास्तव मेस बंद राहील्यास किंवा ठेकेदार मेसचा ठेका संपण्यापूर्वी सोडून गेल्यास संबंधीत ठेकेदारास प्रतीदिन प्रती विद्यार्थी रू. 100/– या प्रमाणे दंड आकारण्यात येईल व सदर दंड भरणे बंधनकारक राहील. दंड न भरल्यास नाईलाजाने प्रशासनास अशा ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. | अटी व शर्तीप्रमाणे ठेका पूर्ण न केल्यास करावयाची कारवाई |
| खंड 3 – जर ठेकेदाराने किंवा त्याच्या कामगारानी कोणतेही भोजन शिजवण्यासाठी ताब्यात दिलेले साहित्य, इमारत, रस्ता, कुपंण इ. ची मोडतोड किंवा नुकसान केले तर तो ते दुरूस्त करेल किंवा नादुरूस्त भाग बदलून देईल. आणि काही नुकसान पोहचले तर ते तो स्वखर्चाने भरून देईल. आणि तसे करण्याचे नाकारले किंवा ते तो करण्यास चुकला तर निविदा मागविणारा अधिकारी ठेकेदाराच्या खर्चाने ते नुकसान भरून काढील व ठेकेदार प्रत देय असलेल्या किंवा देय होतील अशा कोणत्याही कामांमूधन अथवा त्याच्या तारण अनामती मधून तो खर्च वजा करील/वसूल करण्यात येईल. | नुकसान भरपाईसाठी कारवाई |
| खंड 4 – ठेकेदार आपल्या ठेक्याच्या रीतसर पालनासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य अंतिम सुपूर्दगीच्या दिनांकापर्यत / मुदत संपल्यानंतर ताब्यात घेतलेले संपूर्ण साहित्य वसतिगृह प्रशासनाकडे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या समक्ष सुस्थितीत त्वरीत परत करावयाचे आहे. | ठेकेदाराच्या रीतसर पालनासाठी साहित्य संयंत्र पुरविणे |
| खंड 5 – ठेकेदार आपल्या कामगारांना झालेल्या क्षतीबदद्ल क्षमीक भरपाई अधिनियम 1923 (1923– 4/8) या पुढे त्यास उक्त अधिनियम असे म्हटले आहे. याखाली कोणत्याही प्रकारची भरपाई देण्यास जबाबदार राहील व ती तो देईल, जर उक्त अधिनियमाच्या कलम 12 पोट कलम (1) खाली अशी भरपाई विद्यापीठ ठेकेदाराच्या वतीने प्रकर्ता म्हणून दिली तर ती विद्यापीठाला उक्त कलमांच्या पोट कलम (2) खाली ठेकेदाराकडून वसूल करता येईल. अशी भरपाई वर खंड 1 मध्ये नेमून दिलेल्या रितीने वसूल केली जाईल. | श्रमीक भरपाई |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

| | |
|---|---|
| खंड 6 – ठेक्यात समाविष्ठ असलेल्या वस्तूचे बाजारातील दर किंवा अन्य दर आपल्या ठेक्याच्या कालावधीत वाढले आहेत या कारणावरून ठेकेदाराने वाढीव दरासाठी सांगीतलेल्या कोणत्याही दाव्याला किंवा दाव्यांना मान्यता दिली जाणार नाही. म्हणजेच ठेकेदाराने ठेक्यात नमूद केलेल्या दराने मेस चालविण्यास बंधनकारक आहे. | ठेकदाराने ठेक्यात दिलेल्या दराने काम पूर्ण करणेस बांधील राहील. |
| खंड 7 – कोणताही ठेकेदार बाल कामगार कामास ठेवणार नाही व तसे केल्यास होणाऱ्या कारवाईस ठेकेदार स्वतः जबाबदार राहील. | कामावर ठेवलेल्या व्यक्तीचे किमान वय 18 वर्षेवर असावे. |
| खंड 8 – ठेकेदारास द्यावयाचे पैसे एक हजार रू अधिक असल्यास ते पैसे त्यांना ज्या विभागात जास्तीत जास्त सोईचे असेल अशा कोषागारावर धनादेश काढून त्याव्दारे चुकते केले जातील. त्याहून लहान रकमा रोख दिल्या जातील. | पैसे चुकते करण्याची पध्दत |
| खंड 9 – जो कोणताही ठेकेदार या शर्तीचा स्विकार करणार नाही त्याला कामाची निविदा भरू दिली जाणार नाही व त्याचे नाव विद्यापीठाच्या ठेक्याच्या यादीमधून काढून टाकण्यात येईल. | अटी व शर्ती स्विकृत न केल्यास |
| खंड 10 – ठेकेदाराने पुरवावयाचे जेवण हे अटी व शर्तीतील बाबवर्णनाप्रमाणे असणे बंधनकारक आहे. | साहित्याचे बनावटी बाबत |
| खंड 11 – ठेका मंजूर झाल्यानंतर मंजूर कायद्याअंतर्गत करावी लागणारी सर्व बाबींची पूर्तता करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. | मजूर कायद्यांतर्गत करावयाची पूर्तता |
| खंड 12 – ठेकेदारने वेळोवेळी काम करणेस दिरगांई किंवा टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर कार्यवाही करणेत येईल. | सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे |
| खंड 13 – निविदेतील काम करताना विद्यापीठाच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही यांची पूर्ण दक्षता ठेकेदाराने घेणे आवश्यक आहे. नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई पुरवठादाराकडून करून घेण्यात येईल. | मालमत्तेचे नुकसान |
| खंड 14 – निविदेतील कोणत्याही एका बाबीकरीता किंवा संपूर्ण कामाकरीता आगावू पेमेन्ट दिले जाणार नाही | आगावू पेमेन्ट बाबत |
| खंड 15 – निविदेतील कामाच्या अनुषंगाने कोणताही वाद/तंटा/मतभेद निर्माण झाल्यास मा. सहयोगी अधिष्ठाता कृषि महाविद्यालय, दापोली यांचा निर्णय अंतिम राहील व तो उभयतांवर बंधनकारक राहील. | अंतिम निर्णय |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

**सहयोगी अधिष्ठाता**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

## डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## सूची

**1) कामाचे नांव :–** कृषि महाविद्यालय, दापोली येथील वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) पुरवठा करणे

**2) काम करण्याचे ठिकाण व कालावधी :–** वसतिगृह विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, एका शैक्षणिक वर्षाकरीता

**3) वसतिगृहाचे नांव :–** ....................................................................................................

| अ. क्र. | तपशील | दर प्रति प्लेट | | एकूण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| | | अक्षरात | अंकात | |
| 1. | **सोमवार, मंगळवार, गुरूवार, शनिवार** दोन्ही वेळचे **बुधवार, शुक्रवार** दुपारचे शाकाहारी अमर्यादीत जेवण दैनंदिन भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 2. | **बुधवार** रात्री मांसाहारी जेवण (अंडी मर्यादीत) भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 3. | **बुधवार** रात्री शाकाहारी जेवण (स्वीट मर्यादीत) भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 4. | **शुक्रवार** रात्री शाकाहारी मांसाहारी जेवण मर्यादीत भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 5. | **रविवार** दुपारी मांसाहारी जेवण (चिकन मर्यादीत) भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 6. | **रविवार** दुपारी शाकाहारी जेवण (स्वीट मर्यादीत) भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |
| 7. | **रविवार** रात्री शाकाहारी अमर्यादीत जेवण दैनंदिन भोजन मेनू यादीप्रमाणे | | | |

जेवणासाठी सरासरी मासिक दर अंकी रू. ...................................

अक्षरी रू. ....................................................................................................

नास्तासाठी सरासरी मासिक दर अंकी रू. ...................................

अक्षरी रू. ....................................................................................................

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

# दैनंदिन भोजन मेनू – सुवर्णदुर्ग वसतिगृह

## भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + भेंडी सुकी भाजी + पांढरा वाटाणा उसळ + वरण + लोणचे | चपाती + साधा भात + वरण मोड आलेली मटकी उसळ + बटाटा सुकी भाजी + लोणचे + चटणी |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + वरण + दहीसाखर + चणा उसळ + पापड + लोणचे | चपाती + साधा भात + वरण + शेवगा सांबर + टोमॅटो चटणी (सुकी भाजी)+ पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + वरण + मूग उसळ + कॉलीफ्लॉवर (सुकी भाजी) + मीक्स लोणचे | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + मसुर डाळ + श्रीखंड / शिरा<br>**मांसाहारी**– अंडा करी (2 नग) + मासे (1 नग) चपाती +साधा भात +वरण + कांदा+ लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + वरण + छोले उसळ + भोपळा / पडवळ सुकी भाजी + आंबा लोणचे | चपाती + वरण + भात + कढी +बटाटा भाजी सुकी + मुग उसळ + पापड |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + वरण + वटाणा उसळ (हिरवा वटाणा) + कोबी (सुकी भाजी) + मीरची लोणचे | चपाती + साधा भात + वरण + शेवगा सांबर + सोयाबीन सुकी भाजी + शेवयाची खीर + कांदा भजी (5नग) |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + वरण + मसूर उसळ + शिमला मीरची सुकी भाजी + बेसण + लोणचे | चपाती + साधा भात + वरण + मटकी उसळ + भरलेलं वांग (सुकी भाजी) + लोणचं + चटणी |
| **रविवार** | **शाकाहारी**– चपाती + पुलाव + मटार + पनीर भाजी + श्रीखंड / आम्रखंड /बासुंदी + पापड + लोणचे<br>**मांसाहारी** – चपाती + साधा भात + चिकण + चिकन रस्सा + साधा भात + कांदा + लिंबू | पुलाव + सांबर + पापड + लोणचे |

**टिपः– स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 2 फोड, कांदा भजी – 5नग उपवास खिचडी (200ग्रॅम)** + केळं **(1 नग) इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

## दैनंदिन भोजन मेनू – रत्नदुर्ग वसतिगृह

- **भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०**

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + वांगी भाजी (भरलेलं वांग + शेंगदाणा कुटाची भाजी) + हि. वाटाणा उसळ + तिखट डाळ | चपाती + साधा भात + मेथी भाजी(शेंगदाणा कुटाची भाजी) + मोड आलेली मटकी उसळ + वरण + ठेचा |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + भेंडी भाजी + दहीसाखर +फ्लॉवर भाजी (शेंगदाणा कुटाची भाजी) + आवळा लोणचे | चपाती + साधा भात + मुळा/कोबी भाजी (शेंगदाणा कुटाची भाजी) + चवळी उसळ + वरण + पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + गवार + मोड आलेले मूग उसळ + तिखट डाळ + मीक्स लोणचे | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + बटाटा पिवळी भाजी + शेवयाची खिर/ पाइनापल शिरा/गुलाब जाम<br>**मांसाहारी**– अंडा करी (2अंडी) + चपाती + साधा भात +कांदा + लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + लाल माट /कारली/दोडका भाजी + छोले उसळ + तिखट डाळ + आंबा लोणचे | चपाती + पुलाव + पालक भाजी + टोमॅटो चटणी + पापड + जवस चटणी + कांदा |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + बटाटा पातळ भाजी /वाल + काळा मोड आलेला वाटाणा उसळ + वरण + मीरची लोणचे | **शाकाहारी** - चपाती + साधा भात + पनीर भाजी + **5** कांदा भजी + गाजर हलवा/दुधी हलवा<br>**मांसाहारी** – मासे फ्राय (बांगडा/सौदाळ/कोलीम) चपाती + साधा भात + मच्छी करी + कांदा |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + शेवगा भाजी + मसूर उसळ + कढी + पातळ वांग भाजी + लोणचे | भाकरी + मसाला भात + शेपु/मुगडाळ भाजी + पिठलं + कोशिंबीर |
| **रविवार** | **शाकाहारी**– चपाती + पुलाव + पालक पनीर भाजी + श्रीखंड / आम्रखंड /बासुंदी + मिरची लोणचे<br>**मांसाहारी** – भाकरी/चपाती + मसाला चिकन + रस्सा + साधा भात + कांदा + लिंबू | वेज बिर्याणी + मीक्स लोणचे + पापड |

**टिपः– स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 1 फोड, इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

# दैनंदिन नाश्ता मेनू – रत्नदुर्ग वसतिगृह

## नाष्टयाची वेळ सकाळी - ७.०० ते ८.००

| अ. क्र | तपशील | | |
|---|---|---|---|
| | वार | वेळ | मेनू |
| 1. | **सोमवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | मिसळ (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 2. | **मंगळवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | कांदा पोहे (150 ग्रॅम) + दुध (150 मिली) |
| 3. | **बुधवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | इडली (4नग) + चहा (100 मिली) |
| 4. | **गुरूवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | पुरीभाजी (बटाटा भाजी ) + दुध (150 मिली) |
| 5. | **शुक्रवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | **मांसाहारी साठी** – भुर्जीपाव + चहा (100 मिली)<br>**शाकाहारी साठी** – कांदापोहे + चहा (100 मिली) |
| 6. | **शनिवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | फळे + उसळ(मटकी)/दुध (150 मिली) |
| 7. | **रविवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | पूरी भाजी रस्सा (बटाटा भाजी ) + कॉफी (75 मिली) |

निविदा धारकाची स्वाक्षरी
दिनांक रबरी शिक्यासह

सहयोगी अधिष्ठाता,
कृषि महाविद्यालय, दापोली

# दैनंदिन भोजन मेनू (जयप्रभा वसतिगृह)

## भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + फरसबी/वांगी भाजी + हि. वाटाणा उसळ + तिखट डाळ + चींच कोळ + दही वाटी, पापड, लोणचे | चपाती + साधा भात + पालक/मेथी भाजी + मोड आलेली मटकी उसळ + वरण + ठेचा |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + पडवळ/भेंडी भाजी + चणा उसळ + दहीसाखर + तिखट डाळ | चपाती + साधा भात + मुळा/कोबी भाजी + चवळी उसळ + वरण + पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + गवार/दुधी भोपळा भाजी + मोड आलेले मूग उसळ + तिखट डाळ + मीक्स लोणचे + दही वाटी, पापड, लोणचे | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + बटाटा पिवळी भाजी + कडवा वाल + शेवयाची खिर/पाइनापल ि ारा/गुलाब जाम<br>**मांसाहारी–** अंडा करी (2 अंडी) + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + मटार/कारली भाजी + छोले उसळ + तिखट डाळ + आंबा लोणचे + दही वाटी | चपाती + पुलाव + लाल माठ/पालक भाजी + टोमॅटो सार + पापड + जवस चटणी |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + वाली/फ्लॉवर भाजी + काळा मोड आलेला वाटाणा उसळ + वरण + मीरची लोणचे + दही वाटी | **शाकाहारी** - चपाती + साधा भात + कुर्मा भाजी + **5** कांदा भजी/5 मिर्ची भजी + तिखट डाळ + पापड + जाड रवा खीर/गाजर हलवा/दुधी हलवा<br>**मांसाहारी** – मासे फ्राय (बांगडा/सौदाळ/कोलीम) चपाती + साधा भात + मच्छी करी + पापड |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + शेवगा/तोंडली भाजी + मसूर उसळ + कढी + लींबु लोणचे + दही वाटी | चपाती + साधा भात + शेपु/हिरवा माठ भाजी + पिठलं + वरण + शेंगदाणा चटणी |
| **रविवार** | **शाकाहारी–** चपाती + पुलाव + मटार/पालक पनीर भाजी + श्रीखंड /आम्रखंड/बासुंदी + पापड + करवंद लोणचे + दही वाटी<br>**मांसाहारी** – चिकन + चिकन रस्सा + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू | चपाती + घेवडा/दोडका भाजी + मसाले भात + मीक्स लोणचे + पापड |

**टिपः– स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 1 फोड, इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

# दैनंदिन नाष्टा मेनू – (जयप्रभा वसतिगृहाकरीता)

## नाष्टयाची वेळ सकाळी - ७.०० ते ८.००

| अ. क्र. | तपशील | | |
|---|---|---|---|
| | वार | वेळ | मेनू |
| 1. | **सोमवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | मिसळ (150 ग्रॅम) + दोन पाव + रस्सा वाटी + कांदा + लिंबू + चहा (100 मिली) |
| 2. | **मंगळवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | कांदा पोहे (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 3. | **बुधवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | उपमा (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 4. | **गुरूवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | शिरा (150 ग्रॅम) + 1 केळी +चहा (100 मिली) |
| 5. | **शुक्रवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | **मांसाहारी साठी** उकडलेली अंडी 2 + चाट मसाला **शाकाहारी साठी** ब्रेड 4 नग + 100 ग्रॅम जाम |
| 6. | **शनिवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | वडा रस्सा (100 ग्रॅम) + दोन पाव + दुध (150 मिली) |
| 7. | **रविवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | पूरी भाजी रस्सा + कॉफी (75 मिली) |

निविदा धारकाची स्वाक्षरी
दिनांक रबरी शिक्यासह

सहयोगी अधिष्ठाता,
कृषि महाविद्यालय, दापोली

# दैनंदिन भोजन मेनू – (जिजाऊ वसतिगृहाकरीता)

## भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + फरसबी/वांगी भाजी + हि. वाटाणा उसळ + वरण | चपाती + साधा भात + पालक/मेथी भाजी + मोड आलेली मटकी उसळ + वरण + ठेचा |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + पडवळ/भेंडी भाजी + चणा उसळ + दहीसाखर + वरण | चपाती + साधा भात + मुळा/कोबी भाजी + चवळी उसळ + वरण + पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + गवार/ दुधी भोपळा भाजी + मोड आलेले मूग उसळ + वरण | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + बटाटा पिवळी भाजी + कडवा वाल + फ्रुट सॅलेड/गुलाब जाम/हलवा **मांसाहारी–** अंडा करी (2 अंडी)/अंडा भुर्जी/सुकट + चपाती+ साधा भात+ कांदा + लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + मटार/कारली भाजी + छोले उसळ + वरण | चपाती + जिरा राईस + डाल तडका + लाल माठ/पालक भाजी + पापड + कोशिंबीरी |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + वाली/टोमॅटो/शिमला मिरची भाजी + काळा मोड आलेला वाटाणा उसळ + वरण | चपाती + साधा भात + कुर्मा भाजी + **5** कांदा/बटाटा भजी/ बटाटा भजी + रवा खीर/तांदूळ खीर/शेवया खीर |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + शेवगा/तोंडली भाजी + मसूर उसळ + कढी | चपाती + साधा भात + सोयाबीन/शेवगा भाजी + पिठलं + वरण + शेंगदाणा चटणी |
| **रविवार** | **शाकाहारी–** चपाती + पुलाव + मटार पनीर /भरलेल वांगी भाजी + श्रीखंड/आम्रखंड /बासुंदी/गाजर /दुधी हलवा + पापड **मांसाहारी** – चपाती + साधा भात + बांगडा/कोळंबी/चिकन + चिकन रस्सा + कांदा + लिंबू | व्हेज पुलाव + पापड |

**टिपः– स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 1 फोड, इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

- **दैनंदिन नाष्टा मेनू – (जिजाऊ वसतिगृहाकरीता)**

**नाष्टयाची वेळ सकाळी - ७.०० ते ८.००**

| अ. क | तपशील | | |
|---|---|---|---|
| | वार | वेळ | मेनू |
| 1. | **सोमवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | मिसळ (150 ग्रॅम) + दोन पाव + रस्सा वाटी + कांदा + लिंबू + चहा (100 मिली) |
| 2. | **मंगळवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | मेदूवडा सांबर चटणी (100 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 3. | **बुधवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | उपमा (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 4. | **गुरूवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | शिरा (150 ग्रॅम) + 1 केळी +चहा (100 मिली) |
| 5. | **शुक्रवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | **मांसाहारी साठी** उकडलेली अंडी 2 + चाट मसाला<br>**शाकाहारी साठी** ब्रेड 4 नग + 100 ग्रॅम जाम |
| 6. | **शनिवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | वडा रस्सा (100 ग्रॅम) + दोन पाव + दुध (150 मिली) |
| 7. | **रविवार** | सकाळी 7.00 ते 8.00 | पूरी भाजी रस्सा + कॉफी (75 मिली) |

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

## दैनंदिन भोजन मेनू – (सिंधुदुर्ग वसतिगृहाकरीता)

## भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + फरसबी/वांगी भाजी + हि. वाटाणा उसळ + तिखट डाळ + चींच कोळ | चपाती + साधा भात + पालक/मेथी भाजी + मोड आलेली मटकी उसळ + वरण + ठेचा |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + पडवळ/भेंडी भाजी + चणा उसळ + दहीसाखर + तिखट डाळ + आवळा लोणचे | चपाती + साधा भात + मुळा/कोबी भाजी + चवळी उसळ + वरण + पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + गवार/दुधी भोपळा भाजी + मोड आलेले मूग उसळ + तिखट डाळ + मीक्स लोणचे | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + बटाटा पिवळी भाजी + कडवा वाल + शेवयाची खिर/पाइनापल शिरा/गुलाब जाम<br>**मांसाहारी–** अंडा करी (2 अंडी) + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + मटार/कारली भाजी + छोले उसळ + तिखट डाळ + आंबा लोणचे | चपाती + पुलाव + लाल माठ/पालक भाजी + टोमॅटो सार + पापड + जवस चटणी |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + वाली/फ्लॉवर भाजी + काळा मोड आलेला वाटाणा उसळ + वरण + मीरची लोणचे | **शाकाहारी** - चपाती + साधा भात + कुर्मा भाजी + **5** कांदा भजी/5 मिर्ची भजी + तिखट डाळ + पापड + जाड रवा खीर/गाजर हलवा/दुधी हलवा<br>**मांसाहारी** – मासे फ्राय (बांगडा/सौदाळ/कोलीम) चपाती + साधा भात + मच्छी करी + पापड |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + शेवगा/तोंडली भाजी + मसूर उसळ + कढी + लींबु लोणचे | चपाती + साधा भात + शेपु/हिरवा माठ भाजी + उसळ + वरण + शेंगदाणा चटणी |
| **रविवार** | **शाकाहारी**– चपाती + पुलाव + मटार/पालक पनीर भाजी + श्रीखंड/आम्रखंड/बासुंदी + पापड + करवंद लोणचे<br>**मांसाहारी** – चिकन + चिकन रस्सा + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू | चपाती + घेवडा/दोडका भाजी + मसाले भात + मीक्स लोणचे + पापड |

टिपः– **स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 1 फोड, इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

# दैनंदिन नाश्ता मेनू – सिंधुदुर्ग वसतिगृह

## नाष्टयाची वेळ सकाळी - ७.०० ते ८.००

| अ. क्र | तपशील | | |
|---|---|---|---|
| | वार | वेळ | मेनू |
| 1. | **सोमवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | मिसळ (150 ग्रॅम) + दोन पाव + रस्सा वाटी + कांदा + लिंबू + चहा (100 मिली) |
| 2. | **मंगळवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | कांदा पोहे (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 3. | **बुधवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | मेदूवडा (150 ग्रॅम) सांबर + चहा (100 मिली) |
| 4. | **गुरूवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | साबुदाणा (150 ग्रॅम) + 1 केळी + चहा (100 मिली) |
| 5. | **शुक्रवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | **मांसाहारी साठी** उकडलेली अंडी 2 + चाट मसाला<br>**शाकाहारीसाठी** – कांदा पोहे (150 ग्रॅम) |
| 6. | **शनिवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | वडा रस्सा (100 ग्रॅम) + दोन पाव + दुध (150 मिली) |
| 7. | **रविवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | पूरी भाजी रस्सा + कॉफी (75 मिली) |

निविदा धारकाची स्वाक्षरी
दिनांक रबरी शिक्यासह

सहयोगी अधिष्ठाता,
कृषि महाविद्यालय, दापोली

# दैनंदिन भोजन मेनू – कनकदुर्ग वसतिगृह

**भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.३० ते ९.३०**

| वार | दुपारी | रात्री |
|---|---|---|
| **सोमवार** | चपाती + साधा भात + फरसबी/वांगी भाजी + हि. वाटाणा उसळ + तिखट डाळ + चींच कोळ | चपाती + साधा भात + पालक/मेथी भाजी +भेंडी/वांगी भाजी + मोड आलेली मटकी उसळ + वरण + ठेचा |
| **मंगळवार** | चपाती + साधा भात + पडवळ/भेंडी भाजी + चणा उसळ + दहीसाखर + तिखट डाळ + आवळा लोणचे | चपाती + साधा भात + मुळा/कोबी भाजी + चवळी उसळ + वरण + पापड |
| **बुधवार** | चपाती + साधा भात + गवार/दुधी भोपळा भाजी + मोड आलेले मूग उसळ + तिखट डाळ + मीक्स लोणचे | **शाकाहारी** –चपाती + साधा भात + वरण + बटाटा पिवळी भाजी +फ्लावर रस्सा + शेवयाची खिर/पाइनापल शिरा/गुलाब जाम<br>**मांसाहारी–** अंडा करी (2 अंडी) + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू |
| **गुरूवार** | चपाती + साधा भात + मटार/कारली भाजी + छोले उसळ + तिखट डाळ + आंबा लोणचे | चपाती + पुलाव + लाल माठ/पालक भाजी + शेवगा भाजी + पापड + जवस चटणी |
| **शुक्रवार** | चपाती + साधा भात + टोमॅटो चटणी/टोमॅटो भाजी/फ्लॉवर भाजी + काळा मोड आलेला वाटाणा उसळ + वरण + मीरची लोणचे | **शाकाहारी** - चपाती + साधा भात + कुर्मा भाजी + **5** कांदा भजी/5 मिर्ची भजी + तिखट डाळ + पापड + जाड रवा खीर/गाजर हलवा/दुधी हलवा<br>**मांसाहारी** – मासे फ्राय (बांगडा/सौदाळ ) चपाती + साधा भात + मच्छी करी + पापड |
| **शनिवार** | चपाती + साधा भात + शेवगा/तोंडली भाजी + मसूर उसळ + कढी + लींबु लोणचे | चपाती + साधा भात + शेपु/हिरवा माठ भाजी + पिठलं + वरण + शेंगदाणा चटणी |
| **रविवार** | **शाकाहारी–** चपाती + पुलाव + मटार/पालक पनीर भाजी + श्रीखंड/आम्रखंड/बासुंदी + पापड + करवंद लोणचे<br>**मांसाहारी** – चिकन + चिकन रस्सा + चपाती + साधा भात + कांदा + लिंबू | चपाती + घेवडा/दोडका भाजी + मसाले भात + मीक्स लोणचे + पापड |

**टिपः– स्वीट – मर्यादीत 150 ग्रॅम, चिकन – मर्यादीत 150 ग्रॅम, अंडी – 2, मासे फ्राय 1 नग, पापड– प्रत्येकी एक, दही – 150 ग्रॅम, कांदा – 3 फोडी, लिंबू– 1 फोड, इतर सर्व पदार्थ– अमर्यादीत आहेत.**

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**

# दैनंदिन नाश्ता मेनू – कनकदुर्ग वसतिगृह
## नाष्ट्याची वेळ सकाळी - ७.०० ते ८.००

| अ. क्र | तपशील | | |
|---|---|---|---|
| | **वार** | **वेळ** | **मेनू** |
| 1. | **सोमवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | मिसळ (150 ग्रॅम) + दोन पाव + रस्सा वाटी + कांदा + लिंबू + चहा (100 मिली) |
| 2. | **मंगळवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | कांदा पोहे (150 ग्रॅम) + चहा (100 मिली) |
| 3. | **बुधवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | मेदूवडा (150 ग्रॅम) सांबर + चहा (100 मिली) |
| 4. | **गुरूवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | साबुदाणा (150 ग्रॅम) + 1 केळी + चहा (100 मिली) |
| 5. | **शुक्रवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | **मांसाहारी साठी** उकडलेली अंडी 2 + चाट मसाला<br>**शाकाहारीसाठी** – कांदा पोहे (150 ग्रॅम) |
| 6. | **शनिवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | वडा रस्सा (100 ग्रॅम) + दोन पाव + दुध (150 मिली) |
| 7. | **रविवार** | सकाळी 6.30 ते 8.00 | पूरी भाजी रस्सा + कॉफी (75 मिली) |

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**दिनांक रबरी शिक्यासह**

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि महाविद्यालय, दापोली**